# मी विठ्ठल पाहिला?

## वारी अनुभव - लेख क्र. १४

**- राजश्री कुलकर्णी (साऊथ ब्रुन्सविक, न्यूजर्सी)**

**तरडगाव ते फलटण:** (पुढे...)

संध्याकाळी पाचच्या सुमारास ‘फलटण’च्या मुधोजी हायस्कूलमध्ये पोहोचले. सहा वाजता चहा झाला. पावणेसातला अण्णा घाणेकरांचं प्रवचन व भजन होतं. विषय होता, अर्जुनाने कृष्णाला, युध्दक्षेत्री भ्यायल्यामुळे नव्हे, तर आप्तजनांना मारल्यानंतर जे पाप घडेल; त्या पापामुळे भगवंताशी जुळलेलं नातं तुटेल, या भीतीने युध्द करायला नकार दिला.

रात्रीच्या जेवणात नेहमीपेक्षा वेगळी ‘राघवदास’ वडी होती. रवा -बेसनाची ती राघवदास वडी अप्रतिम-चवदार होती. देशमुख दिंडीचे ते स्वयंपाकी सुगरण होते, हे नि:संशय! रात्री १० वाजता (अनघा येरंडेच्या) गोडसे काकांकडे 'शिवमंगल' बंगल्यामध्ये रहायला गेले. अतिशय सुंदर घर आणि त्याहून चांगली लोकं होती. मला घ्यायला त्यांनी त्यांची गाडी पाठवली. दोन मजली घर, अंगणात तुळशी वृंदावन, दारासमोर रांगोळी, पांढऱ्याशुभ्र संगमरवरी फरश्या, पाहुण्यांची वर्दळ,... त्या घरात सुबत्ता, स्नेह आणि संस्कृती एकत्र नांदत होते. माझ्या आणि चित्राशिवाय, इतर बरेच वारकरी त्यांच्याकडे रात्री मुक्कामाला होते. आम्हाला दोघींना, त्यांनी स्वतंत्र खोली दिली. स्वच्छ बाथरूम, भरपूर पाणी, दिवे, प्रकाश, खेळती हवा,... खूप बरं वाटलं. आजचा चौथा दिवस असल्यामुळे तेल, shampoo लावून मनसोक्त आंघोळ केली. रात्री शांत झोप लागली.



सौ. हेमा किशोर गोडसे, सौ राजश्री कुलकर्णी

**मंगळवार जुलै १, २०१४:**



त्या दिवशी फलटणमधे मुक्काम होता. मुक्कामाचं ठिकाण असल्यामुळे, त्या दिवशी आईची मऊ पांढरी वायलची साडी घातली! गोडसेंकाकांकडून सकाळी लवकर मुक्कामाच्या ठिकाणी आले. ही शाळा मोठी होती. वारीच्या या प्रवासातील इतर गावांच्या तुलनेने ‘फलटण’ मोठं शहर होतं. तिथे स्थळं होती. राममंदीर, (शिवाजीमहाराजांची पत्नी- सईबाई निंबाळकर, हिचं माहेर) वाडा, इ. दिंडीतील बरेच लोक पर्यटनासाठी गेले. मी मात्र गेले नाही. मला त्यादिवशी एकटंच शांत बसावंसं वाटत होतं.

त्या दिवशी, खरं तर माऊलीच्या कृपेने रात्री झोपही मस्त लागली. तब्येतही ठीक होती किंवा शारीरिक तक्रारी सहन करण्याचं बळ आलं होतं. इतक्या प्रतिकूल हवामानात राहूनही पोट, पाय, डोकं सगळं 'त्या मानाने' ठीक होते. नाश्त्याला उपमा खाल्ला. कोणीतरी पंडीत भीमसेन जोशींची गाणी लावली होती. दुपारी जेवण झाल्यावर एक डुलकी घेतली. बाथरूमसाठी शाळेच्या मागच्या आवारात गेले. खरंतर ते अंतर विशेष नव्हतं. पण हात भाजून निघाले. ऊन तर खूप होतंच, पण आता हात खूपच संवेदनशील झाले होते; दंडापासून मनगटापर्यंत हात लालसर झाले होते, खूप खाज येत होती.

वारीमध्ये दर दिवशी आठवणीत राहतील असे लोक भेटायचे, काही तरी नवीन माहिती मिळायची. अमोल आव्हाळे, वय वर्षे १८, हा त्यातलाच एक होता. न सांगता माझ्यासाठी पाण्याची बाटली घेऊन आला. अमोल इयत्ता अकरावीत शिकत होता. तो वारीमधे पाण्याचा टँकर चालवायचा. त्याचे २०,००० रुपये मिळायचे. त्यापैकी, त्याला ५००० रूपये मिळायचे. त्याच्या पाण्याच्या ट्रकमध्ये ६०००-७००० लिटर्स पाणी मावायचं. तो म्हणाला की, "पाण्याचा ट्रक अर्धा भरलेला असताना, तो चालवणं खूप अवघड असतं कारण ते पाणी टॅन्करमधे हलत असतं. पाण्याच्या जडत्वामुळे ट्रक थांबवायचा असेल तर, ट्रक थांबवण्याच्या बराच वेळ आधीपासून ब्रेक दाबणं सुरू करावं लागतं. आणि भारतात तर कोणतीही वाहने, कोठूनही, कधीही येतात, त्यामुळे सतत सतर्क रहावं लागतं. अपघात होऊ न देता त्या लाखो लोकांसोबत, वारीमध्ये पाण्याचा तो ट्रक चालवणं, खरंच कौशल्याचं काम होतं.




दुपारी चहा झाला. ६ ते ७ प्रवचन झालं. प्रवचनात, अण्णांनी गुरूचं स्थान, गुरू असणं किती महत्वाचं आहे, ते सांगितलं. संध्याकाळ झाली होती. रात्रीच्या जेवणाला थोडा वेळ होता. मंगलाताई, संजीवनी, आशाताई, लीलाताई, (अनुभवी, जेष्ठ वारकरी) चित्रा, ह्या सगळ्या वारकरी बायका, मुक्कामाच्या ठिकाणी गप्पा मारीत होत्या. माझे हात 'अतिशय' वाईट अवस्थेत होते. डास चावल्यानंतर गडद लाल रंगाच्या गुथी (फोड)

यावे, असे दोन्ही हात भरले होते. मी 'सगळ्यांमधे असूनही एकटी' होते. तसंही त्यादिवशी सकाळपासून कोणाशी बोलावसं वाटत नव्हतंच. मनात 'माऊली-माऊली' असा जप करीत होते. पुढच्या प्रवासात माझ्यापुढे अजून काय काय वाढून ठेवलं आहे, याचा मनात विचार करीत असतानाच रमाताई, सुलोचनाताईंना घेऊन आल्या. **सुलोचनाताई** (वय वर्षे ८२) डॉक्टरकडे जायला निघाल्या होत्या. मी त्यांच्यासोबत डॉ. सुरेखा यादव यांच्याकडे गेले. डॉक्टर श्री. व सौ. यादव यांचा दोन खोल्यांचा छोटासा दवाखाना होता. वारकऱ्यांसाठी ते मोफत उपचार करीत होते. मला डॉक्टर सुरेखा यांनी आतल्या खोलीत बोलावलं. माझ्या पूर्वीच, त्यांच्या खोलीत गावाकडचे दोन लोक होते. समोरच्या टेबलावर ३ उघड्या काचेच्या भांड्यांमध्ये वेगवेगळ्या रंगांच्या गोळ्या ठेवलेल्या होत्या. सुरेखाबाईंनी एका जुन्या वर्तमानपत्राच्या कागदात हाताला येतील तशा गोळ्या घातल्या आणि रोज घ्यायला सांगितल्या. माझ्या छातीत धस्स झालं. पण म्हणतात ना, आलिया भोगासी असावे सादर! मला मात्र डॉक्टरांनी व्यवस्थित माहिती विचारली. त्या मला म्हणाल्या की, "सनस्क्रीन लोशन लावा" (ते तर लावतंच होते), "शक्यतोवर उन्हात चालू नका, उन्हात चालणं टाळा" (हे कसं शक्य होणार होतं?) त्या म्हणाल्या की, "तीव्र सूर्यप्रकाश किंवा खाद्यपदार्थ/पाणी यापैकी कशाची तरी तुम्हाला जबरदस्त ॲलर्जी आली आहे." “कोणतं औषध घेता आहात कां?” मला कोणत्या औषधाची ॲलर्जी नाही ना, याची खात्री करून त्यांनी माझ्या डाव्या कंबरेत एक इंजेक्शन दिलं. मी भीत-भीत, ‘तुम्ही इंजेक्शनची सुई बदलली ना’, एवढं विचारल्याचं मला आठवतं.

हात दाखवल्यानंतर, मला माझ्या सुजलेल्या/मुरगळलेल्या पायाचीही आठवण झाली. आता आलेच आले, तर पायाबद्दलही विचारावं, म्हणून त्यांना माझा सुजलेला पाय दाखवला आणि कॉम्बिफ्लेम घेते आहे, हेही सांगितलं. “तुला कॉम्बिफ्लेम खूप तीव्र होते आहे, कदाचित त्याची ॲलर्जी असू शकेल, आधीच कां सांगितलं नाही’, असं म्हणून त्यांनी उजव्या कंबरेत दुसरं इंजेक्शन दिलं, आणि काही गोळ्या मेडिकल शॉपमधून आणायला सांगितल्या. दोन दिवस तर नक्की घेच आणि त्यानंतर ‘गरज असेल’ तर चालूच ठेव, असं सांगितलं.

माझ्या देशमुख दिंडीमधे त्या रात्री जेवायला दलिया/खिचडी होती. गोडसेंकडील दहा मंडळी जेवायला होती. रात्री फक्त झोपण्यापुरती गोडसेंच्या घरी गेले. रात्री झोपण्यापूर्वी, परत एकदा माझ्या दोन्ही हातांकडे नजर टाकली, जादूची कांडी फिरवावी, असा बदल झालेला दिसला, फोडांचा लालसरपणा खूपच कमी झाला होता. रात्रीपर्यंत हात बरेच ‘बरे’ झाले होते. अनुभवी डॉ. सुरेखा यादव, यांचे मनोमन खूप आभार मानले.

'फलटणचा मुक्काम' वारीच्या प्रवासाला एक छानशी कलाटणी देऊन गेला. **(क्रमशः)**